**महाराष्ट्र शासन**

सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे — ४११ ००१

Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक — ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२


क्रमांक -ससं/उशि/सामाईक प्र. परिक्षा/पुवि/२०२४/6115 दि. २६/०६/२०२४


तु.च. कॉलेज, बारामती
आवक नंबर: Gen/45
दिनांक: 27 JUN 2024


प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे विभाग,
३. प्राचार्य / प्राचार्या, सर्व अशासकीय अनुदानित /कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, पुणे विभाग.

विषय - **सन २०२३-२४ करिता उच्च शिक्षण विभागांतर्गत सहा प्रशिक्षण केंद्रे तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील प्रशिक्षण केंद्रासाठी आयोजित दि. २५.८.२०२४ रोजी होणा-या एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षेची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वाढीव सहभागासाठी निदर्शनास आणून देणेबाबत तसेच संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्दी सहसंचालक, विद्यापीठातील अधिकारी, प्राचार्य व संचालक पीआयटीसी समवेत संयुक्त बैठकीचे आयोजनाबाबत..**

संदर्भ - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/२०२४/ ना.से.पू परिक्षा २५/सामाईक प्र. परिक्षा/प्रशा-३ दि. ६, २०२४.
२. संचालक, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांचे पत्र क्र. प्री-आयएएसनाशिक/ आस्था/२०२४/२०९ दि. १४.६.२०२४.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र. प्रिआय/५४१९/प्र.क्र.२४०/मशि-२ दि. १.११.२०२२ अन्वये राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व सर्व भारतीय प्रशासकीय सेवापूर्वक प्रशिक्षण केंद्र नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतर्गत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचलित डॉ. आंबेडकर स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, पुणे, संचालक, पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित सावित्रीबाई फुले ॲकेडमी, पुणे, अंबरनाथ नगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र, अंबरनाथ, ठाणे महानगरपालिका संचलित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, ठाणे इ. केंद्रामधील प्रवेशासाठी **दिनांक २५.८.२०२४ रोजी सुधारित SIAC CET २०२५ लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याचे माहितीपत्र सोबत जोडले आहे.**

तरी राज्यातील युपीएसीतील विद्यार्थ्यांचा मराठी टक्का वाढावा या करिता पुणे विभागातील सर्व महाविद्यालयांमधील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेण्यासाठी आपल्या विद्यापीठातील / महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नागरी सेवापूर्व परीक्षा २०२५ साठीची सामाईक प्रवेश परीक्षेची जाहिरात सर्वच विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. **त्याकरिता आपल्या विद्यापिठाच्या / महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर ही जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी तसेच आपल्या विद्यापीठाच्या व महाविद्यालयाच्या नोटीसबोर्डवर सदर जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी.**

All VP / Upload on college website / Telegram group of students & Teachers

(डॉ.केशव तुपे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

सोबत - वरीलप्रमाणे.

प्रत - मा. शिक्षण संचालक, उ.शि.म.रा. पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,**

**४१२ ई, बहिरट पाटील चौक,मॉडेल कॉलनी,शिवाजीनगर,पुणे ४११०१६**

**Phone No. ०२०-२६१२२११९ Web :www.dhepune.gov.in** **Email : prash.dhepune@nic.in**


जा.क्र.उशिसं/२०२४/ना.से.पू परिक्षा २५/सामाईक प्र.परिक्षा/प्रशा-३/ दिनांक .६.२०२४

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक

(उच्च शिक्षण)

**विषय- सन २०२३-२४ करिता उच्च शिक्षण विभागांतर्गत सहा प्रशिक्षण केंद्रे तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील प्रशिक्षण केंद्रासाठी आयोजित दि.२५.८.२०२४ रोजी होणा-या एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षेची माहिती महाविदयालयातील विदयार्थ्यांच्या वाढीव सहभागासाठी निदर्शनास आणून देणेबाबत तसेच संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्दी सहसंचालक,विदयापीठातील अधिकारी प्राचार्य व संचालक पीआयटीसी समवेत संयुक्त बैठकीचे आयोजनाबाबत..**

संदर्भ- १.संचालक,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई यांचे पत्र क्र.एसआयएसी/२०२४/प्रवेश परीक्षा/४३४ दि.६.६.२०२४.

२.संचालक,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई यांचे पत्र क्र.एसआयएसी/२०२३-२४/सुधारित प्रवेश परिक्षा दिनांक/४५७ दि.१४.६.२०२४

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्राचे अनुषंगाने कळविणेत येते की, शासन निर्णय क्र.प्रीआय/५४१९/प्र.क्र.२४०/मशि-२ दि.१.११.२०२२ अन्वये राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई व सर्व भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र,नाशिक,कोल्हापूर,औरंगाबाद,अमरावती व नागपूर तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतर्गत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचलित डॉ.आंबेडकर स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र,पुणे,संचालक,पुणे,पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित सावित्रीबाई फुले अकॅडमी पुणे,अंबरनाथ नगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र,अंबरनाथ,ठाणे महानगरपालिका संचलित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था,ठाणे इ.केंद्रामधील प्रवेश परिक्षेसाठी दि.४.८.२०२४ रोजी ऑफलाईन सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.याकरिता इच्छुक पात्र उमेदवारांकडून Online पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. तथापि विदयार्थ्यांनी केलेल्या सूचनेचा विचार करून संचालक,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई या कार्यालयाने दि.१०.६.२०२४ रोजी आयोजित केलेल्या संचालक व विदयार्थी समवेत झालेल्या बैठकीनुसार सदर सुधारित SIAC CET २०२५ लेखी परीक्षा दिनांक २५.८.२०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी राज्यातील युपीएसीतील विदयार्थ्यांचा मराठी टक्का वाढावा करिता राज्यातील जास्तीत जास्त विदयार्थ्यांना याचा लाभ घेता यावा याकरिता आपले कार्याक्षेत्रातील सर्व शासकीय/अशासकीय महाविदयालयातील विदयार्थ्यांना नागरी सेवापूर्व परीक्षा २०२५ साठीची सामाईक प्रवेश परीक्षेची जाहिरात आपल्या विभागातील महाविदयालयातील शिकणा-या सर्वच विदयार्थ्यांच्या निर्दशनास आणून देण्यात यावी. तसेच सामाईक प्रवेश परीक्षेची जाहिरात व सुधारित परीक्षा दिनांकाबाबतचे पत्र आपले कार्यालयाच्या तसेच सर्व विदयापीठ यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी तसेच विभागीय सहसंचालक,प्राचार्य,विदयापीठ अधिकारी व संचालक पीआयटीसी समवेत एकत्रित बैठक घेणेत यावी. (सोबत सामाईक प्रवेश परीक्षेची जाहिरात प्रत व सुधारित परिक्षा दिनांकाबाबतचे संचालक,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई यांचे संदर्भाधिन पत्र क्र.०२ ची प्रत जोडलेली आहे)

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 21-06-2024 13:31:46

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- १.मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२.संचालक,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक
**PRE IAS TRAINING CENTRE, NASHIK**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आवार, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक ४२२ २२२

Web : iasnasik.org.in    दुरध्वनी व फॅक्स-०२५३-२२३०१००    E- mail : iasnasik@gmail.com

जा.क्र.प्री-आयएएसनाशिक/आस्था/२०२४/209    दि. 14/06/2024

प्रति,

१. मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे.
२. मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव.
३. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, चेहेडी (बु), सामनगांव, नाशिक.

विषयः विभागातर्गत अधिनस्त सर्व विद्यापीठे, शासकीय व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालये येथे सामायिक प्रवेश परीक्षा CET-2025 जाहिरात प्रसिध्दी करणेबाबत.

संदर्भ : १) मा. संचालक, SIAC, मुंबई, यांच्याकडील पत्र जा.क्र.एसआयएसी/२०२३-२४/प्रवेश परीक्षा/४३५, दि. ०६/०६/२०२४.
२) मा. संचालक, SIAC, मुंबई, यांच्याकडील पत्र जा.क्र.एसआयएसी/२०२३-२४/प्रवेश परीक्षा/४५७, दि. १४/०६/२०२४.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये सादर करण्यात येते की, उच्च शिक्षण विभागांतर्गत राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (SIAC), भा. प्र. से. केंद्र, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (YASHADA),, संचालित डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र (ACEC), पुणे, ठाणे महानगरपालिकेचे सी. डी. देशमुख युपीएससी स्पर्धा परीक्षा केंद्र, ठाणे, अंबरनाथ नगर पालिका संचालित युपीएससी स्पर्धा परीक्षा केंद्र, अंबरनाथ आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) संचालित सावित्रीबाई फुले अकॅडेमी, पुणे मार्फत केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२५ साठी पूर्ण वेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता सामायिक प्रवेश परीक्षेचे (Offline mode) आयोजन दि. २५/०८/२०२४ रोजी करण्यात येत आहे.

इच्छुक पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळण्याकरीता उपरोक्त संदर्भान्वये आपल्या विभागातर्गत अधिनस्त सर्व विद्यापीठे, अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालये येथे सामायिक प्रवेश परीक्षा CET-2025 जाहिरात प्रसिध्दी करणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

सोबतः सामायिक प्रवेश परीक्षा CET-2025 जाहिरातीची छायांकित प्रत.

(डॉ. मालोजीराव स. भोसले)
संचालक,
भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

प्रतः मा. संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय व शिक्षण संस्था, (SIAC), मुंबई.

**SIAC नागरी सेवा पुर्व परीक्षा २०२५ च्या नि:शुल्क प्रशिक्षणासाठी नोंदणी अर्ज करण्यास मुदतवाढ सुचना**

राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व सर्व भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतर्गत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचलित डॉ.आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित सावित्रीबाई फुले अकॅडमी पुणे, अंबरनाथ नगरपालिकेचे स्पर्धा परीक्षा केंद्र, अंबरनाथ, ठाणे महानगर पालिका संचलित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, ठाणे ई. केंद्रामधील प्रवेश परिक्षेसाठी सन २०२४ च्या अंतिम वर्षात पदवीला बसलेले व यापुर्वी पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या जाहीरातीतील नमुद इतरही अटी शतीर्ची पुर्तता करणा-या विदयार्थ्यांकडून नागरी सेवा पुर्व परीक्षा नि:शुल्क प्रशिक्षणासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे सदर परीक्षा सुधारीत परीक्षा दिनांक २५.०८.२०२४ रोजी ऑफलाईन पद्धतीने महाराष्ट्रातील सात (मुंबई ,पुणे, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर ) केद्रांवर आयोजित करण्यात येणार आहे. या करीता इच्छुक पात्र उमेदवार Online पध्दतीने अर्ज भरण्यास मुदतवाढ दिनांक ०१.०७.२०२४ पासून २०.०७.२०२४ पर्यंतच्या कालावधीत आणि दिनांक २१.०७.२०२४ कालावधीत परीक्षा शुल्क चलन भरणा करणेकामी मुदतवाढ देण्यात येत आहे ऑनलाईन अर्ज करण्यासाठी siac.org.in मधील SIAC MUMBAI नागरी सेवा पुर्व परीक्षा प्रशिक्षण सामाईक प्रवेश परीक्षा CET २०२४-२५ नोंदणीसाटीची लिंक मधील REGISTRATION NOW ला जावुन प्रवेश अर्ज नोंदणी करावी. तसेच सदर नागरी सेवा पुर्वपरीक्षा प्रशिक्षण २०२५ च्या जाहीरातीच्या अनुषगांने सविस्तर माहीतीसाठी / वेळोवेळी सुचनांसाटी या कार्यालयांचे अधिकृत संकेतस्थळ siac.org.in यांचे अवलोकन करावे.

राज्यातील UPSC परीक्षेत महाराष्ट्रातील मराठी विदयार्थ्यांचे प्रमाण वाढावे करिता महाराष्ट्र राज्यातील जास्तीत जास्त पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांनी प्रशिक्षांचा लाभ घेणेकामी नोंदणी करुन घेण्यात येणारी सीईटीसाटी देण्यात आलेल्या मुदतवाढीचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

Date. :- 26-06-2024
Place :- Mumbai

डॉ स्वाती वाव्हळ
संचालक,
(SIAC) मुंबई
समन्वयक, सामायिक प्रवेश परीक्षा